# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 11/05/2021 (मंगळवार)

(दुपार)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### पोलिस स्टेशन भिवापुरची कार्यवाही

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत पारवे पट्रोलपंप भिवापुर(चेक पोस्ट) येथे दिनांक 10/05/2021 चे 17.00 वा. दरम्यान भिवापुर पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन भिवापुर पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एमएच– 49/एटी – 5017 क्रमांकाच्या महिन्द्रा पिकअप गाडीला थांबवुन तपासणी केली असता त्यामध्ये एकुण 6(हेले) कि. 15,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपी क्र. 1) जितेंद्र जयराम पाकमोडे, वय 41 वर्ष, 2) राहुल शामराव बाळबुधे, वय 27 वर्ष, 3) शाहरूख सय्यैद बरकत अली सय्यैद, वय 24 वर्ष, रा. गेवर्धा ता. कुरखेडा जि. गडचिरोली यांच्या ताब्यातुन 6 जनावरे व वाहन असा एकुण किंमती 5,90,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस उपनिरीक्षक श्री चनगोले, पो.स्टे. भिवापुर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11(1)(डी)5, 9 प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, तसेच सहकलम 83, 177 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. नरेन्द्र पटले 9422812080 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला यांचे मार्गदर्शनात ठाणेदार पोनि श्री. महेश भोरटेकर, पोउपनि प्रकाश चंगोले, पोशि निकेश आळीकर व दोन होम गार्ड सैनीक यांनी पार पाडली.






पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर